**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.**

# प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक व शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरुन परीक्षेस प्रविष्ठ होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

फेब्रुवारी - मार्च २०१९ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यासाठी नावनोंदणी अर्ज ( फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे स्विकारण्याचा यापूर्वीचा अंतिम कालावधी अतिविलंब शुल्काने दिनांक.७/११/२०१८ ते १४/११/२०१८ व २६/११/२०१८ ते ०५/१२/२०१८ या दरम्यान निश्चित करण्यात आला होता.

याबाबत सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, इ. १० वी व १२ वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्काने ऑफलाईन (OFFLINE) पध्दतीने स्विकारण्याच्या मुदतवाढीबाबतच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत. त्याकरिता Blank Template Form मंडळाच्या खालील वेबसाईट वर उपलब्ध आहेत .

संकेतस्थळ- इ.१० वी **http.//form17.mh-ssc.ac.in** इ.१२ वी **http.//form17.mh-hsc.ac.in**

| अ.क्रं. | माध्यमिक शाळांनी /कनिष्ठ महाविद्यालयांनी अतिविलंब शुल्क प्रती विद्यार्थी रुपये २०/- प्रतिदिन स्विकारुन विभागीय मंडळाकडे ऑफलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्ज भरावयाच्या वाढीव तारखा (इ.१० वी व इ.१२ वी) |
|---|---|
| १ | **शनिवार दिनांक १५/१२/२०१८ ते सोमवार दिनांक ३१/१२/२०१८** |

इयता १० वीच्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब शुल्कासह प्राप्त झालेले नाव नोंदणी अर्ज विहित शुल्क व मूळ कागदपत्रासह त्यावर LATE FORM शेरा लिहून **शुक्रवार दिनांक ०४/०१/२०१९** पर्यंत संपर्क केंद्रानी विभागीय मंडळाकडे हस्तपोहोच जमा करावेत. तसेच इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे नाव नोंदणी अर्ज विहित शुल्क व मूळ कागदपत्रासह त्यावर **LATE FORM** शेरा लिहून विभागीय मंडळ कार्यालयात **दिनांक ०४/०१/२०१९** पर्यंत हस्तपोहोच जमा करावेत. अतिविलंब व इतर शुल्क रोख स्वरुपात मंडळात जमा करुन घेण्यात येईल.

दि.१४/१२/२०१८

14.12.18
( श्री.सुरेश मा.आवारी )
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Acer/msword/letter